भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२

(१९७२ चा अधिनियम क्रमांक ६२)

[१ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Limestone and Dolomite Mines Labour Welfare Fund Act, 1972

## (Act No. 62 of 1972)

[As in force on 1st November, 1977]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[किंमत–५० पैसे]

170

# चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२

कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. चुनखडी व डोलोमाइट यांवर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

४. उत्पादनशुल्क भरणे.

५. उत्पादनशुल्काच्या उत्पन्नाचा विनियोग.

६. सल्लागार समित्या.

७. केंद्रीय सल्लागार समिति.

८. निरीक्षक इत्यादींची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.

९. केंद्र शासनाची सूट देण्याची शक्ती.

१०. या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था केलेल्या कार्यांचा वार्षिक अहवाल.

११. कारखान्यांच्या कार्यचालकांनी व खाणींच्या मालकांनी द्यावयाचे व्याज.

१२. उत्पादनशुल्क विहित कालावधीमध्ये न भरण्याबद्दल दंड.

१३. या अधिनियमाखालील येणे रकमांची वसुली.

१४. उत्पादनशुल्क चुकवण्याबद्दल दंड.

१५. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

१६. नियम करण्याची शक्ती.

# चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२

## (१९७२ चा अधिनियम क्र. ६२)

[ १२ डिसेंबर, १९७२ ]

**चुनखडी आणि डोलोमाइट खाणींमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींचे कल्याणप्रवर्धन करण्यासाठी योजलेल्या कार्यांची वित्तव्यवस्था करण्याकरिता चुनखडी आणि डोलोमाइट यांवर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे यांबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :––

१. (१) या अधिनियमास 'चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,–– व्याख्या.

(क्) "एजंट" व "मालक" यांना 'खाणी अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५) याचे कलम २–पोटकलम (१) चे खंड (ग्) आणि (ठ्) यांमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत ;

(ख्) "कारखाना" आणि "कार्यचालक" यांना 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३)–कलम २ चे खंड (ड्) व (ढ्) यांमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत ;

(ग्) "व्यवस्थापक" याचा अर्थ 'खाणी अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५)–कलम १७ मध्ये निर्देशित केलेला व्यवस्थापक असा आहे ;

(घ्) (१) जर एखादी व्यक्ती, अशा खाणीच्या वास्तूमध्ये किंवा त्यालगतच्या परिसरात अशा खाणीच्या मालकाने, एजंटाने किंवा व्यवस्थापकाने अथवा कंत्राटदाराने किंवा अन्य कोणत्याही यंत्रणेने केवळ खालीलपैकीच कोणत्याही एका किंवा अधिक कामांवर लावलेली असेल, ती कामे अशी––

(एक) कोणतेही चुनखडी किंवा डोलोमाइट खाणकाम ;

(दोन) अशा खाणीमध्ये किंवा तिच्या परिसरात वापरली जाणारी कोणतीही यंत्रसामग्री किंवा तिचा कोणताही भाग चालवणे, तिचे संधारण करणे, ती सुस्थितीत ठेवणे किंवा दुरुस्त करणे ;

(तीन) चुनखडी किंवा डोलोमाइट अथवा चुनखडी किंवा डोलोमाइट खाणकामाशी संबंधित असलेले अन्य कोणतेही साहित्य चढवणे, उतरवणे किंवा रवाना करणे ;

(चार) अशा खाणीच्या प्रसीमांच्या कक्षेत असलेल्या कोणत्याही कार्यालयातील, आहारगृहातील किंवा पाळणाघरातील कोणतेही काम ;

(पाच) अशा वास्तूमध्ये किंवा त्यालगतच्या परिसरात असलेल्या पण जेथे कोणतीही निवासी इमारत नाही अशा कोणत्याही जागी कोणतेही कल्याण, आरोग्य, स्वच्छता किंवा साफसफाई सेवा किंवा कोणतीही राखण व पहारा यासंबंधीची कामे ; किंवा

(२) जर ती, याबाबत केंद्र शासन **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशा कोणत्याही क्षेत्रात अशा खाणीच्या मालकाने, एजंटाने किंवा व्यवस्थापकाने अथवा कंत्राटदाराने किंवा अन्य कोणत्याही यंत्रणेने केवळ चुनखडी किंवा डोलोमाइट अथवा चुनखडी किंवा डोलोमाइट खाणकामाच्या संबंधातील अन्य कोणतेही साहित्य चढवणे, उतरवणे किंवा रवाना करणे या कामांवर लावलेली असेल,

तर ती चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीमध्ये कामाला लावलेली आहे असे म्हटले जाते ;

(ङ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे.

३. केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकी व तेव्हापासून, कोणत्याही खाणीतून काढलेली चुनखडी किंवा डोलोमाइट यांपैकी जेवढे–– चुनखडी व डोलोमाइट यांवर उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

(एक) कोणत्याही कारखान्याच्या कार्यचालकाला विकले असेल किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट केली असेल ; किंवा

(दोन) सिमेंट, लोखंड किंवा पोलाद यांच्या निर्मितीशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनार्थ त्या खाणीच्या मालकाने वापरले असेल,

तेवढयावर या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा वेळोवेळी निश्चित करील असे, चुनखडीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, डोलोमाइटच्या प्रत्येक मेट्रिक टनास जास्तीत जास्त एक रुपया एवढया दराने उपकर म्हणून उत्पादनशुल्क बसवले जाईल व त्याची उगराणी केली जाईल.

**स्पष्टीकरण**.––जेव्हा कोणत्याही चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीचा मालक हा कोणत्याही कारखान्याचा कार्यचालक असेल तेव्हा, खंड (दोन) च्या प्रयोजनार्थ, खाणीतून उत्पादित केलेली आणि दुसऱ्या कोणत्याही कारखान्याच्या कार्यचालकाला न विकलेली किंवा अन्यथा विल्हेवाट न केलेली सर्व चुनखडी किंवा डोलोमाइट हे, विरुद्ध शाबीत केले गेले नाही तर, अशा मालकाने सिमेंट, लोखंड किंवा पोलाद याच्या निर्मितीशी संबंधित असलेल्या प्रयोजनासाठी वापरले असल्याचे मानण्यात येईल.

उत्पादनशुल्क भरणे.

४. (१) या अधिनियमाखाली चुनखडी किंवा डोलोमाइट यांवर बसविण्यायोग्य असलेले प्रत्येक उत्पादनशुल्क––

(क्) ज्या व्यक्तीने अशी चुनखडी किंवा डोलोमाइट कारखान्याच्या कार्यचालकाला विकले असेल किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट केली असेल त्या व्यक्तीकडून अशा कार्यचालकाला ;

(ख्) चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीच्या मालकाने सिमेंट, लोखंड किंवा पोलाद यांच्या निर्मितीच्या संबंधातील प्रयोजनार्थ कोणतीही चुनखडी किंवा डोलोमाइट वापरले असेल तेव्हा अशा मालकाकडून केंद्र शासनाला,

विहित असेल अशा कालावधीमध्ये प्रदेय असेल.

(२) कारखान्याचा कार्यचालक, पोटकलम (१) च्या खंड (क्) मध्ये निर्देशित केलेल्या सर्व रकमेची विहित असेल अशा रीतीने उगराणी करील आणि अशा कालावधीमध्ये केंद्र शासनाकडे तिचा भरणा करील.

उत्पादनशुल्काच्या उत्पन्नाचा विनियोग.

५. (१) या अधिनियमाखाली बसवलेल्या उत्पादनशुल्काच्या उत्पन्नामधून, केंद्र शासन निश्चित करील तितका उगराणीचा खर्च वजा जाता येणाऱ्या रकमेइतकी रक्कम व त्याचबरोबर, उक्त रकमेच्या गुंतवणुकीपासून झालेली कोणतीही प्राप्ती, तसेच केंद्र शासनाला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मिळालेला अन्य कोणताही पैसा, संसदेने कायद्याद्वारे रीतसर विनियोजन केल्यानंतर 'चुनखडी आणि डोलोमाइट कामगार कल्याण निधि' (यात यापुढे 'निधि' म्हणून निर्देशित केलेला) या नावाच्या निधीच्या खाती जमा केली जाईल.

(२) केंद्र शासनाकडून निधीचा विनियोग चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींचे कल्याणप्रवर्धन करण्याकरता केंद्र शासनाच्या मते आवश्यक किंवा समयोचित असणाऱ्या उपाययोजनांच्या संबंधांत करावा लागणारा खर्च भागवण्यासाठी आणि विशेषतः पुढील गोष्टींसाठी करण्यात येईल :––

(क्) चुनखडी किंवा डोलोमाइट खाणींमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींच्या हितासाठी ––

(एक) सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता यांची सुधारणा, रोगप्रतिबंध आणि वैद्यकीय सुविधांची तरतूद व सुधारणा ;

(दोन) पाण्याच्या साठ्यांची तरतूद व सुधारणा आणि धुण्याच्या सोयी ;

(तीन) शिक्षणविषयक सोयींची तरतूद व सुधारणा ; आणि

(चार) निवासव्यवस्था आणि पोषक आहार यांसुद्धा राहणीमानात सुधारणा, सामाजिक स्थितिसुधार आणि मनोरंजनाच्या सुविधा,

यांस अनुलक्षून केलेल्या उपाययोजनांचा खर्च भागविणे;

(ख्) चुनखडी किंवा डोलोमाइट खाणींमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींच्या कल्याणप्रवर्धनाच्या संबंधातील कोणत्याही प्रयोजनार्थ केंद्र शासनाने मान्य केलेल्या कोणत्याही योजनेस साहाय्य करण्यासाठी राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा चुनखडी अथवा डोलोमाइट खाणीचा मालक यांना कर्ज किंवा अर्थसाहाय्य मंजूर करणे ;

(ग्) चुनखडी किंवा डोलोमाइट खाणमालकांपैकी ज्यांनी त्यांच्या खाणीमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींच्या हितासाठी केंद्र शासनाचे समाधान होईल अशा रीतीने विहित दर्जाच्या कल्याणकारी सुविधांची तरतूद केली असेल अशा कोणत्याही मालकांना वर्षाकाठी सहायक अनुदान देणे,––तथापि अशा कोणत्याही मालकाला सहायक अनुदान म्हणून प्रदेय असलेली रक्कमही––

(एक) केंद्र शासनाकडून किंवा त्याने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून निश्चित करण्यात आल्याप्रमाणे कल्याणकारी सुविधांची तरतूद करण्यासाठी त्याने खर्च केलेली रक्कम, किंवा

(दोन) विहित करण्यात येईल अशी रक्कम,

यांपैकी जी कमी असेल त्या रकमेहून अधिक असणार नाही :

परंतु चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीच्या मालकाने तरतूद केलेल्या कल्याणकारी सुविधांच्या बाबतीत पूर्वोक्ताप्रमाणे निश्चित केल्यानुसार त्यावर खर्च केलेली रक्कम जर याबाबत विहित केलेल्या रकमेहून कमी असेल तर, कोणतेही सहायक अनुदान प्रदेय असणार नाही.

(घ) अनुक्रमे कलमे ६ व ७ यांखाली स्थापन केलेल्या सल्लागार समित्या आणि केंद्रीय सल्लागार समिती यांच्या सदस्यांचे काही भत्ते असल्यास ते, आणि कलम ८ खाली नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काही वेतन व भत्ते असल्यास ते देणे ;

(ङ) निधीमधून भागवावयाचा खर्च म्हणून केंद्र शासन निर्देशित करील असा अन्य कोणताही खर्च.

सल्लागार समित्या.

६. (१) चुनखडी व डोलोमाईटचे उत्पादन काढणाऱ्या राज्यांसाठी केंद्र शासन, त्या त्या राज्याकडून निधीच्या विनियोगाच्या संबंधातील बाबी धरून या अधिनियमाच्या प्रशासनामधून उद्भवणाऱ्या ज्या बाबी केंद्र शासनाकडे निर्देशित केल्या जातील त्यांबाबत केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी त्यास योग्य वाटतील तितक्या पण प्रत्येकी एकापेक्षा अधिक होणार नाहीत इतक्या सल्लागार समित्या घटित करू शकेल.

(२) प्रत्येक सल्लागार समिती ही, केंद्र शासन त्या समितीवर नियुक्त करील तितक्या व्यक्ती मिळून बनलेली असेल आणि हे सदस्य विहित करण्यात येईल अशा रीतीने निवडले जातील :

परंतु प्रत्येक सल्लागार समितीमध्ये, शासन, चुनखडी व डोलोमाईट खाणींचे मालक आणि चुनखडी व डोलोमाईट खाणींमध्ये कामाला असलेल्या व्यक्ती यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या सारखीच असेल आणि अशा प्रत्येक समितीत निदान एक तरी स्त्री-सदस्य असेल.

(३) प्रत्येक सल्लागार समितीचा अध्यक्ष केंद्र शासनाकडून नियुक्त केला जाईल.

(४) केंद्र शासन प्रत्येक सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करील.

केंद्रीय सल्लागार समिति.

७. (१) केंद्र शासनास, कलम ६ खाली स्थापन केलेल्या सल्लागार समित्यांच्या कार्यांचे समन्वयन करण्यासाठी आणि या अधिनियमाच्या अंमलबजावणीमधून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबतीत केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी एक केंद्रीय सल्लागार समिती घटित करता येईल.

(२) केंद्रीय सल्लागार समिती ही, केंद्र शासन त्या समितीवर नियुक्त करील तितक्या व्यक्ती मिळून बनलेली असेल आणि हे सदस्य, विहित करण्यात येईल तशा रीतीने निवडले जातील :

परंतु, केंद्रीय सल्लागार समितीमध्ये शासन, चुनखडी आणि डोलोमाईट खाणींचे मालक व चुनखडी आणि डोलोमाईट खाणींमध्ये कामाला असलेल्या व्यक्ती यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या समसमान असेल.

(३) केंद्रीय सल्लागार समितीचा अध्यक्ष केंद्र शासनाकडून नियुक्त केला जाईल.

(४) केंद्र शासन केंद्रीय सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करील.

निरीक्षक इत्यादींची नियुक्ती व त्यांच्या शक्ती.

८. (१) केंद्र शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक वाटतील तितके निरीक्षक, कल्याण प्रशासक आणि असे अन्य अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल.

(२) अशी नियुक्ती झालेली प्रत्येक व्यक्ती 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—कलम २० च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही निरीक्षकाला किंवा कल्याण प्रशासकाला,—

(क) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी जेथे प्रवेश करणे त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही जागी कोणत्याही योग्य वेळी त्याला योग्य वाटेल असे काही साहाय्य मिळाल्यास त्यानिशी प्रवेश करता येईल;

(ख) अशा जागेमध्ये आपली कर्तव्ये योग्य रीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक ते काहीही करता येईल ; आणि

(ग) विहित करण्यात येतील अशा इतर शक्ती वापरता येतील.

केंद्र शासनाची सूट देण्याची शक्ती.

९. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या भागात चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींच्या कल्याणप्रवर्धनासाठी योजलेल्या कार्यांच्या वित्त-व्यवस्थेसाठी पर्याप्त उपबंध करणारा कायदा अंमलात आहे अशी केंद्र शासनाची खात्री झाल्यास त्याला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांच्या व आपरिवर्तनांच्या अधीनतेने अशा राज्यात किंवा त्याच्या भागात या अधिनियमाचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही उपबंध लागू होणार नाहीत किंवा लागू होतील असे निदेशित करता येईल.

या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था केलेल्या कार्यांचा वार्षिक अहवाल.

१०. केंद्र शासन प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर होईल तितक्या लवकर, मागील वित्तीय वर्षात या अधिनियमाखाली वित्तव्यवस्था झालेल्या आपल्या कार्यांचा वृत्तांत देणारा अहवाल व त्याबरोबर हिशेब विवरणपत्र **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करवील.

कारखान्यांच्या कार्य-चालकांनी व खाणींच्या मालकांनी द्यावयाचे व्याज.

११. जर कोणताही कारखान्याचा कार्यचालक किंवा चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीचा मालक कलम ४ खाली केंद्र शासनाला त्याने द्यावयाची कोणतीही रक्कम त्याकरिता त्या कलमाखाली विहित करण्यात आलेल्या कालावधीमध्ये देण्यास चुकला तर, असा कार्यचालक किंवा, प्रकरणपरत्वे, असा मालक प्रदेय रक्कम ज्या दिनांकाला प्रदेय होते त्या दिनांकापासून ती रक्कम प्रत्यक्षात दिली जाईपर्यंत अशा रकमेवर दरसाल दरशेकडा बारा या दराने सरळ व्याज देण्यास पात्र असेल.

उत्पादनशुल्क विहित कालावधी-मध्ये न भरण्याबद्दल दंड.

१२. जर कलम ४ खाली कारखान्याच्या कार्यचालकाने किंवा चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीच्या मालकाने केंद्र शासनाला प्रदेय असलेले एखादे उत्पादनशुल्क त्याखालील विहित कालावधीमध्ये त्या शासनाकडे भरले नाही तर, ते थकित म्हणून मानण्यात येईल आणि याबाबतीत विहित केलेल्या प्राधि-करणास स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी करून नंतर कारखान्याच्या कार्यचालकावर किंवा, प्रकरणपरत्वे, चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीच्या मालकावर जास्तीत जास्त थकित उत्पादनशुल्काच्या रकमेइतका दंड बसवता येईल :

परंतु, असा कोणताही दंड बसवण्यापूर्वी अशा कार्यचालकाला किंवा, प्रकरणपरत्वे, अशा मालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल आणि असे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर कोणत्याही सबळ व पुरेशा कारणामुळे अशी कसूर झाली असल्याची उक्त प्राधिकरणाची खात्री पटली तर, या कलमाखाली कोणताही दंड बसवण्यात येणार नाही.

या अधिनियमा-खालील येणे रकमांची वसुली.

१३. या अधिनियमाखाली कारखान्याच्या कोणत्याही कार्यचालकाकडून किंवा चुनखडी किंवा डोलोमाईट खाणीच्या कोणत्याही मालकाकडून केंद्र शासनाला येणे असलेली कोणतीही रक्कम (कलम ११ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम १२ खाली प्रदेय असे काही व्याज किंवा दंड असल्यास ते धरून) जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

उत्पादनशुल्क चुकवण्याबद्दल दंड.

१४. (१) जो कोणी या अधिनियमाखाली त्याच्याकडून केंद्र शासनाला प्रदेय असलेले उत्पादनशुल्क भरण्याचे बुद्धिपुरःसर किंवा उद्देशपूर्वक चुकवील किंवा चुकवण्याचा प्रयत्न करील तो, दोषी ठरल्यास सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) कोणतेही न्यायालय केंद्र शासनाने किंवा त्याच्या प्राधिकाराअन्वये तक्रार केलेली असेल तर तेवढे सोडून एरव्ही, या कलमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याची दखल घेणार नाही.

कंपन्यांनी केलेले गुन्हे.

१५. (१) या अधिनियमाखालील गुन्हा एखाद्या कंपनीने केलेला असेल तर, गुन्हा घडला त्यावेळी जी व्यक्ती कंपनीची हुकूमतदार असेल आणि कंपनीचा कारभार चालवण्याबाबत जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्या विरुध्द कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा होण्यास त्या पात्र असतील :

परंतु जर अशा कोणत्याही व्यक्तीने गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा असा गुन्हा घडू नये यासाठी आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले तर, या पोटकलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील गुन्हा कंपनीने केलेला असून तो, कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मुकानुमतीने करण्यात आला आहे अथवा त्याच्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुध्द कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल :

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगमनिकाय असा आहे आणि त्यात, पेढी किंवा अन्य व्यक्तिसंघाचाही समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

१६. (१) केंद्र शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, या नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येतील :—

(क) या अधिनियमाखाली बसवलेल्या उत्पादनशुल्काचे निर्धारण व उगराणी;

(ख) कारखान्यांच्या कार्यचालकाला चुनखडी किंवा डोलोमाइट विकणारी किंवा ते अन्यथा संक्रामित करणारी व्यक्ती अशा कार्यचालकाला किती कालावधीमध्ये उत्पादनशुल्क देईल;

(ग) चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीचा मालक किती कालावधीमध्ये केंद्र शासनाला उत्पादनशुल्क देईल ;

(घ) कारखान्याचा कार्यचालक कशा रीतीने उत्पादनशुल्काची उगराणी करील;

(ङ) कारखान्याचा कार्यचालक त्याने उगराणी केलेले उत्पादनशुल्क किती कालावधीमध्ये केंद्र शासनाला देईल ;

(च) या अधिनियमाखाली बसवलेल्या उत्पादनशुल्काच्या उगराणीचा खर्च ठरवणे;

(छ) कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांसाठी कशा रीतीने निधीचा विनियोग करता येईल;

(ज) कलम ५ चे पोटकलम (२)–खंड (ख) खाली कर्ज किंवा अर्थसाहाय्य यांच्या मंजुरीचे नियमन करणाऱ्या शर्ती;

(झ) कलम ५ चे पोटकलम (२)–खंड (ग) च्या प्रयोजनार्थ चुनखडी किंवा डोलोमाइट खाणीच्या मालकांनी तरतूद करावयाच्या कल्याणकारी सुविधांचा दर्जा;

(ञ) कलम ५ चे पोटकलम (२)–खंड (ग)–उपखंड (दोन) आणि त्या खंडाचे परंतुक यामध्ये निर्देशित केलेल्या रकमा ठरवणे;

(ट) अनुक्रमे कलमे ६ व ७ यांखाली स्थापन करण्यात आलेल्या सल्लागार समित्या व केंद्रीय सल्लागार समिती यांची रचना, कशा रीतीने त्यांचे सदस्य निवडले जातील ते, अशा सदस्यांचा पदावधी, त्यांना प्रदेय असणारे काही भत्ते असल्यास ते आणि उक्त सल्लागार समित्या व केंद्रीय सल्लागार समिती कशा रीतीने आपले कामकाज चालवतील ते;

(ठ) कलम ८ खाली नियुक्त केलेल्या सर्व व्यक्तींची भरती, सेवाशर्ती आणि कर्तव्ये;

(ड) कलम ८ खाली निरीक्षकाला किंवा कल्याण प्रशासकाला वापरता येतील अशा शक्ती;

(ढ) कारखान्यांच्या कार्यचालकाने आणि चुनखडी किंवा डोलोमाइट खाणींच्या मालकांनी, एजंटांनी किंवा व्यवस्थापकांनी जी आकडेवारी किंवा माहिती वेळोवेळी शासनाला पुरविणे आवश्यक असते अशी आकडेवारी किंवा अन्य माहिती केंद्र शासनाला पुरवणे;

(ण) कोणत्या प्राधिकरणाला कलम १२ खाली कोणताही दंड बसवता येईल.

(३) केंद्र शासनाला पोटकलम (२) च्या खंड (ख) किंवा खंड (ढ) खाली कोणताही नियम करताना त्याच्या भंगाचे हे कृत्य पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल असे निदेशित करता येईल.

(४) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

# THE LIMESTONE AND DOLOMITE MINES LABOUR WELFARE FUND ACT, 1972

## चुनखडी आणि डोलोमाइट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| agent | एजंट | [S·2(*a*)] |
| amelioration of social conditions | सामाजिक स्थितिसुधार | [S·5(2)(*a*)(*iv*)] |
| application of proceeds | उत्पन्नाचा विनियोग | [S·5-m.n.] |
| Chairman | अध्यक्ष | [S·6(3)] |
| constitute | घटित करणे | [S·7(1)] |
| dolomite | डोलोमाइट | [S·1] |
| factory | कारखाना | [S·2(*b*)] |
| financing of activities | कार्यांची वित्तव्यवस्था | [Long title] |
| housing | निवासव्यवस्था | [S·5(2)(*a*)(*iv*)] |
| levy and collection of cess | उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे | [S·3-m.n.] |
| limestone | चुनखडी | [S·1] |
| maintenance | सुस्थितीत ठेवणे | [S·2(1)(*ii*)] |
| manager | व्यवस्थापक | [S·2(*c*)] |
| medical facilities | वैद्यकीय सुविधा | [S·5(2)(*a*) (*i*)] |
| mining operation | खाणकाम | [S·2(1)(*i*)] |
| nutrition | पोषक आहार | [S·5(2)(*a*)(*iv*)] |
| occupier | कार्यचालक | [S·2(*b*)] |
| operation of machinery | यंत्रसामग्री चालवणे | [S·2(1)(*ii*)] |
| owner | मालक | [S·2(*a*)] |
| persons employed | कामाला लावलेल्या व्यक्ती | [Long title] |
| promote the welfare | कल्याणप्रवर्धन करणे | [Long title] |
| public health | सार्वजनिक आरोग्य | [S·5(2)(*a*)(*ii*)] |
| recreational facilities | मनोरंजनाच्या सुविधा | [S·5(2)(*a*)(*iv*)] |
| sanitation | स्वच्छता | [S·5(2)(*a*)(*ii*)] |
| servicing | संधारण | [S·2(1)(*ii*)] |
| standards of living | राहणीमान | [S·5(2)(*a*)(*iv*)] |
| watch and ward duties | राखण व पहारा यासंबंधीची कामे | [S·2(1)(*v*)] |

चुनखडी आणि डोलोमाईट खाणी कामगार कल्याण निधि अधिनियम, १९७२

# THE LIMESTONE AND DOLOMITE MINES LABOUR WELFARE FUND ACT, 1972

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | Chairman | [S·6(3)] |
| उत्पन्नाचा विनियोग | application of proceeds | [S·5-m.n.] |
| उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे | levy and collection of cess | [S·3-m.n.] |
| एजंट | agent | [S·2(*a*)] |
| कल्याणप्रवर्धन करणे | promote the welfare | [Long title] |
| कामाला लावलेल्या व्यक्ती | persons employed | [Long title] |
| कारखाना | factory | [S.2(*b*)] |
| कार्यचालक | occupier | [S.2(*b*)] |
| कार्याची वित्तव्यवस्था | financing of activities | [Long title] |
| खाणकाम | mining operation | [S.2(1)(*i*)] |
| घटित करणे | constitute | [S.7(1)] |
| चुनखडी | limestone | [S.1] |
| डोलोमाईट | dolomite | [S.1] |
| निवासव्यवस्था | housing | [S.5(2)(*a*)(*iv*)] |
| पोषक आहार | nutrition | [S.5(2)(*a*)(*iv*)] |
| मनोरंजनाच्या सुविधा | recreational facilities | [S.5(2)(*a*)(*iv*)] |
| मालक | owner | [S.2(*a*)] |
| यंत्रसामग्री चालवणे | operation of machinery | [S.2(1)(*ii*)] |
| राखण व पहारा यासंबंधीची कामे | watch and ward duties | [S.2(1)(*v*)] |
| राहणीमान | standards of living | [S.5(2)(*a*)(*iv*)] |
| वैद्यकीय सुविधा | medical facilities | [S.5(2)(*a*)(*i*)] |
| व्यवस्थापक | manager | [S.2(*c*)] |
| संधारण | servicing | [S.2(1)(*ii*)] |
| सामाजिक स्थितिसुधार | amelioration of social conditions | [S.5(2)(*a*)(*iv*)] |
| सार्वजनिक आरोग्य | public health | [S.5(2)(*a*)(*ii*)] |
| सुस्थितीत ठेवणे | maintenance | [S.2(1)(*ii*)] |
| स्वच्छता | sanitation | [S.5(2)(*a*)(*i*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई